ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय

# फादर डेमियन



महारोग्यांच्या सेवेसाठीं आपले प्राण वेंचणारा

IRBK-0106242
IRBK-0106242

लेखक : अमरेन्द्र

फादर

# डेमियन

## लोक-सेवक : ५

दुःख दुसऱ्याचें जाणावें ।
जाणोन तरी वांटोनि घ्यावें ।।

लेखक : अमरेन्द्र

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ६२८२ नों. दि ..............
वि. ... क्र. ..............

किंमत ५० नये पैसे

IRBK-0106242

वोरा ॲन्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड
३, राउंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २.

प्रकाशक :

एम. के. वोरा, वोरा अ‍ॅन्ड कं. पब्लिशर्स प्रा. लि.
३, राउंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २.

लेखक :
अमरेन्द्र

आवृत्ति :
पहिली–१९५७

पानें :
अठ्ठावीस

किंमत :
पन्नास नये पैसे

मुद्रक :

अ. चिं. रायरीकर, स्वस्तिक मुद्रणालय,
४३९ शनवार पेठ, पुणें २.

22.083
8
391914

# हीं उदाहरणें—हे आदर्श !

आजकाल ‘ सेवा ’ हा शब्द सवंग झाला आहे. एकादी गोष्ट, एकतर भरपूर झाली कीं स्वस्त होते, सवंग होते. नाहींतर अस्सल मालांत भेसळ झाली किंवा त्याची खोटी नक्कल झाली कीं ती स्वस्त-सवंग मिळूं लागते. खरी कस्तुरी पैसाभर घ्यावयाची म्हटली तरी पसाभर पैसे ओतावे लागतात; पण कस्तुरीचें नांव व नुसता वास दिलेली पासरीभर मातीहि पैशाला मिळूं शकते !

आपल्याकडे सध्यां ‘सेवे’च्या बाबतींत असेंच झालें आहे. पण खरें म्हणजे सेवा ही कांहीं इतकी साधी स्वस्त गोष्ट नाहीं. भक्ति जशी सुळावरची पोळी म्हटली आहे; तशीच खरी सेवाहि आहे. कारण खऱ्या सेवेचा कसच हा कीं, जें करायचें तें काळजाच्या कळकळीनें; पण त्याच्या मोबदल्यांत कोणीं कांहीं देईल अशी इच्छाहि न बाळगतां करायचें. या लोकसेवक चरित्र-मालेंतील प्रत्येक चरित्र असेंच असलेलें दिसेल. ठक्कर बाप्पांनीं अशी खरी सेवा केली. गाडगे महाराजांनीं केली. रविशंकरनीं केली. पण त्या सेवेंत त्यांना आपलें खरें आयुष्य लोकांकरितां देऊन टाकावें लागलें; लोकांकडून उलट कांहीं न मागतां देऊन टाकावें लागलें. आणि त्यालाच त्यांनीं खरी ‘ सेवा ’ मानली.

या पुस्तकांत ज्याची हकीकत सांगितली आहे त्याचें नांव ‘ डेमियन ’. हा एक सामान्य ख्रिस्ती पाद्री होता. पण त्यानें केलेली सेवा खरोखरीच असामान्य होती. माणूस एकवेळ चटकन् फांसावर आपली मान देईल, किंवा पेटत्या बंदुकीसमोर उभा राहून छातीवर गोळी खाईल. पण कणाकणांनीं आपल्या शरिराचे लचके तोडीत राहणें, क्षणाक्षणांनीं आपलें

आयुष्य लोकांच्या सेवेसाठीं वेंचीत राहणें, हें फार कठीण असतें. फादर डेमियननें तें कठीण व्रत करून दाखवलें. पण याहिपेक्षां कठीण काम त्यानें केलें आहे. तें म्हणजे आपली प्रकृति धडधाकट असतांना लोकांच्या सेवेसाठीं स्वतःला घाणेरड्या रोगाच्या तावडींत देणें. महारोगी माणसाकडे पाहायलाहि किळस वाटते. त्याच्या जवळपास फिरकायचीहि धास्ती वाटते. पण डेमियननें तशा रोग्यांच्या सेवेसाठीं सर्व धोके पत्करले. जगापासून जिवंतपणींच दूर जाण्याची तयारी केली. ‘जगाला माझें नांव माहीत होऊं नये’ हीच इच्छा त्यानें केली. स्वतःच्या देहावरची ममता सोडली. तशीच आपल्या नांवाचीहि हांव सोडली.

कांकणभर काम करून गाडाभर नांव मिळवूं पाहणारे लोक आपल्याला इथे दिसतात. सेवेचा नुसता देखावा करून गांवभर नगारा वाजविणारी मंडळी आपल्याला आढळतात. पण यानें सेवेचें पुण्य तर घडत नाहींच, उलट ढोंगीपणाचें पाप स्वतःला जडून इतरांतहि तें पसरण्याचा धोका असतो. खरें म्हणजे सेवा दुसऱ्यासाठीं कधींच करायची नसते. ती करायची असते त्या सेवेपासून स्वतःला आनंद मिळावा म्हणून. त्यापासून मनाला समाधान व शांतता लाभावी म्हणून. सेवेबद्दल ज्याची अशी कल्पना बनली तोच खरा सेवा करायला लायक. त्याच्या हातूनच खरी सेवा घडेल. रडत राऊत घोड्यावर बसवून जसा उपयोग नाहीं, तसाच स्वार्थी सेवक सेवेच्या आखाड्यांत ढकलून कांहीं उपयोग नाहीं. देवाची भक्ति जशी देवासाठीं करायची नसते, स्वतःच्या मनाला आनंद व्हावा म्हणून करायची असते. तसेंच लोकांची सेवा लोकांसाठीं करायची नसते, स्वतःला आनंद लाभावा म्हणून करायची असते. ज्यांचीं मनें अशा सेवानंदांत रमतात तेच खरेखुरे लोकसेवक बनतात तेच सेवावीरांचे आदर्श होतात.

आपल्या देशांत अशी सेवा करण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत. निरक्षरांना साक्षर करणें ही एक सेवा. तशीच रोग्यांना निरोगी बनविण्यासाठीं झटणें हीहि सेवाच. महारोगी हा तर फारच दुर्दैवी रोगी. महात्मा गांधींनीं अशा एका रोग्याची सेवा स्वतःच्या हातांनीं केली होती. गाडगे महाराज तर अशा रोग्यांची काळजी स्वतः लक्ष घालून घेत. या दुष्ट रोगानें पछाडलेले लक्षावधि रोगी आपल्या देशांत दुर्दैवानें आजहि आहेत. त्यांच्यासाठीं सरकारी सेवेच्या सोयी कांहीं झाल्या आहेत. सामाजिक सेवेच्याहि होत आहेत. तरीपण या बाबतींत अजून केवढें तरी काम व्हायचें पडलें आहे.

फादर डेमियननें हजारों मैल दूर जाऊन अशा रोग्यांची सेवा केली. त्याच्या ठिकाणीं स्वतःच्या ख्रिस्ती धर्माबद्दल अतिशय श्रद्धा होती. त्याचा देवावर कमालीचा विश्वास होता. आणि त्याचें आपल्या कामावर–आपल्या सेवेवर मनापासून प्रेम होतें. ज्या लोकांची सेवा करायची त्यांच्यावरच नुसतें प्रेम असून भागत नाहीं, स्वतःच्या सेवेवरहि सेवकाचें प्रेम असावें लागतें. तसें तें डेमियनचें होतें. म्हणूनच तो आदर्श लोकसेवक झाला. आणि म्हणूनच त्याचें चरित्र इथें लिहून आपल्यासमोर मांडलें आहे. त्याच्यापाशीं असलेल्या या गुणांतूनच त्याच्या अंतःकरणांत अपार धैर्य आलें. त्या त्याच्या गुणांतूनच त्याचें कार्य सिद्धीस गेलें. त्याच्या गुणांतूनच त्याचा धर्म व त्याचा देश मोठा दिसला.

खरीखुरी कांहीं सेवा करायची आहे का ? मग त्यांना असे आदर्श समोर ठेवावेच लागतील–अशीं उदाहरणें समोर वागवावींच लागतील.–जशीं या सहा पुस्तकांत सांगितली आहेत.

—लेखक

- जिवंतपणींचा नरकवास
- जोसेफ जोगी बनला
- सेवा-भूमीकडे रवाना
- सेवा हेंच जीवन—
- —आणि सेवेंतच मरण



# फादर डेमियन

:

## जिवंतपणींचा नरकवास

अमेरिकेच्या पश्चिमेला पॅसिफिक महासागर आहे. याला मराठींत प्रशान्त महासागर असेंहि म्हणतात. या महासागराच्या उत्तर भागांत—म्हणजे उत्तर (पॅसिफिक) प्रशान्त महासागरांत हवाई किंवा सँडविच नांवाचीं बेटें आहेत. देवानें या बेटांना निसर्गाचें सौंदर्य अगदीं मोकळ्या हातांनीं दिलेलें आहे. पर्वतांनीं व नद्या-झऱ्यांनीं हा प्रदेश भरलेला आहे. परंतु—परंतु या बेटांना एक भयंकर शापहि मिळालेला आहे. या बेटांतील माणसांच्या मागें एक भयंकर भीति लागलेली आहे.

एकूण आठ बेटांचा हा समूह आहे. यांपैकींच मोलोकाई हें एक लहानसें बेट. या बेटाला उंचच उंच डोंगरांचा वेढा पडलेला आहे. सुमारें २००० फूट उंचीची ही निसर्गाची भिंतच आहे म्हणाना. या भिंतीच्या पलीकडे सुमारें ऐंशी-नव्वद वर्षांपूर्वीं एक विलक्षण इतिहास घडला. इतका विलक्षण कीं ऐकून माणसाचें काळीजच थरकावें !

त्यावेळचें मोलोकाई म्हणजे प्रत्यक्ष नरक ! जगांतून उठलेल्या जिवांना आपलें जिणें जगण्यासाठीं असलेलें ठिकाण. इथें राहणारे लोक जिवंत असून मेल्यासारखे. त्यांचा जगाशीं कधीं संबंध यायचा नाहीं कीं जगाचा त्यांच्याशीं यायचा नाहीं. कां ? असें कोणतें पाप त्यांनीं केलें होतें ? कसला गुन्हा त्यांच्या हातून घडला होता ?-त्यांचें पाप त्यांचा भयंकर रोग. त्यांचा गुन्हा म्हणजे ते अति क्रूर, दुष्ट रोगाच्या तावडींत सांपडलेले होते — ते महारोगी होते. रक्तपितीच्या त्या रोग्यांकडे पाहतांच किळस यावी. त्यांच्या वाऱ्याला उभें राहण्यांतहि धास्ती वाटावी. हवाई बेटांतील साऱ्या महारोग्यांची वस्ती मोलोकाई बेटावर होती. तसा तेथील राजानें कायदाच करून टाकलेला होता—कीं ज्याला महारोग झाला असल्याचा संशय येईल त्यालाहि पकडून मोलोकाईवर नेऊन टाकावें.

मोलोकाईवर असे हजारों दुर्दैवी रोगी येऊन पिचत पडलेले होते. त्यांना औषध द्यायला डॉक्टर-वैद्य नव्हता. त्यांची शुश्रूषा करायला कोणी सगा-नातलग नव्हता. त्यांना धीर देऊन त्यांच्याशीं दोन गोड शब्द तरी बोलेल असा कोणी साधु-सन्तहि तिथें नव्हता. कारण हें बेट हवाईच्या राजानें जगापासून अगदीं तोडून टाकलेलें होतें. महारोग्याखेरीज कोणालाहि तिथें जायला बंदी होती. तिथून परतायलाहि परवानगी नव्हती.

त्या भयंकर किळसवाण्या रोगानें देह कणाकणांनीं खाल्ला जाईल. वर्षानुवर्ष तशा केविलवाण्या स्थितींत खितपत पडेल. आणि अनेक वर्षांनीं मृत्यूच त्यांना सोडवील तेव्हां.

हवाईतील महारोगी मोलोकाईवर पाठवायचे म्हणजे तो एक दुःखकारक प्रसंगच असायचा. मोलोकाईवर जाणें

म्हणजे यमपुरींत जाणें. मृत्यूच्या हद्दींत हद्दपार होणें. मग त्या माणसाची जन्मांत कधींहि भेट व्हायची नाहीं. नातलगांपासून तोडून घरादारापासून कायमचें दूर व्हायचें. जिवंतपणीं उघड्या डोळ्यांनीं मरण पत्करायचें.

ही एक बोट होनोलुलु बंदरांतून सुटत आहे. होनोलुलु ही हवाई बेटांची राजधानी. संध्याकाळचे पांच वाजताहेत. सूर्याचा लाल गोळा समुद्रांत बुडतांना दिसतो आहे......बोट सुटली. तिनें थोडें अंतर कापलें. ती एका धक्क्यापाशीं जाऊन पुन्हां उभी राहिली. आतां अंधार पडला. फिक्कट पिवळा चंद्रमा आकाशांत डोकावत आहे. त्याचें हिरवट लांबट प्रतिबिंब समुद्रावर हिंदकाळतांना दिसतें आहे. धक्क्यावरून बोटीवर येत असलेल्या काळ्या काळ्या आकृतींची ही एक माळका. त्यांतलें कोणी बोलत नाहीं, पण त्यांचे हुंदके मात्र काळजांत घुसत आहेत. ही माळका मोलोकाईवर–म्हणजे हवाईच्या काळ्या पाण्यावर–चाललेल्या महारोग्यांची आहे. त्या दुर्दैवी रोग्यांचे अनेक आप्तेष्ट त्यांना निरोप देण्यासाठीं–अखेरचा निरोप देण्यासाठीं किनाऱ्यावर जमले आहेत. "चाललांत का हो तुम्ही !" एका गरीब बाईनें हंबरडा फोडला. तिचा नवरा त्या कमनशिबी माळकेंतून बोटीवर चालला आहे.

...याप्रमाणें कोण्या गरीब बाईचा नवरा दैवानें तिच्यापासून तोडून त्या भयंकर मरणभूमीकडे–त्या नरकवासाकडे चालविला आहे. तर कोणाची प्राणाइतकी आवडती बायको तिकडे नेली जात आहे. कोणा मुलांचे आईबाप चालले आहेत, तर कोणाचीं भाऊ-बहीण चाललीं आहेत.

तो देखावा कोणाचाहि जीव कालवारून टाकणारा असे.

कितीहि कठीण काळीज असलें तरी त्याच्यांतून आसवें पाझरूं लागावींत असा असे.

मग फादर डेमियन हा तर कमालीचा कनवाळू. त्याच्या कनवाळूपणाला तर खरोखरीच सीमा नव्हती.



त्याच्या तरुणपणींची गोष्ट आहे. एका गरीब माणसाची एक गाय कांहीं तरी आजार होऊन अगदीं जागेला खिळून पडली होती. त्या गरिबाला ती गाय म्हणजे केवढा आधार. ती आतां जगत नाहीं असें जनावरांचा वैद्य सांगून गेला होता त्यामुळें तें गरीब कुटुंब मोठें दुःखी कष्टी झालें होतें. डेमियनला. तें कळलें. त्याबरोबर तो त्या गाईच्या गोठ्यांत जाऊन थडकला. त्या बिचाऱ्या गाईला कसाईखान्यांत नेण्यासाठीं आलेल्या कसायाला त्यानें परत पिटाळून लावलें. आणि बसला त्या आजारी गायीची सेवाचाकरी करीत. सारी रात्र त्यानें डोळ्याला डोळा लावला नाहीं. गाईला औषधपाणी देत, तिच्याकडे लक्ष ठेवीत तो रात्रभर तिथेंच बसून होता. त्या कनवाळू माणसाला गाईचे कष्ट पाहवत नव्हते. तिला आराम पडावा म्हणून तो झटत होता. अखेर दिवस उजाडला आणि गाय आतां हातची

जात नाहीं अशी खात्री झाली. डेमियननें एक दु:खी जीव वांचवला होता.

मुक्या प्राण्याच्या दु:खाबद्दल एवढी काळजी ! मग चालत्याबोलत्या माणसाच्या दु:खानें तो विरघळला नाहीं तरच नवल. तरुणपणीं गाईची सेवाचाकरी केली तेव्हां तर तो एक साधा विद्यार्थी होता. हवाई बेटांत तो आला तेव्हां त्याचें वयहि वाढलेलें होतें; आणि त्या ठिकाणीं तो लोकांची, दीन-दु:खितांची सेवा करायची म्हणूनच आलेला होता. आपल्या धर्माचें काम करायचें म्हणून आलेला होता. त्यामुळें मोलोकाईवर चाललेली महारोग्यांची माळका पाहून त्याचें काळीज करुणेनें भरून गेलें. मोलोकाईवर जाणाऱ्यांचे नातेवाईक मागें राहात त्यांना धीर देण्याचें काम डेमियनला करावें लागेच. पण त्याच्या मनांत उभे राहात ते मोलोकाईवर जाऊन पडलेले दुर्दैवी जीव. त्यांना कोण धीर देणार ? त्यांचें समाधान कोण करणार ? तिथें ना डॉक्टर-वैद्य, ना कोणी सन्त-भक्त. जिवंतपणींच भयंकर नरकांत पिचत पडलेले ते मनुष्यप्राणी !

शेवटीं डेमियननें ठरविलें कीं आपण तिथेंच जाऊन राहायचें. मोलोकाईंतल्या महारोग्यांची सेवा करायची. त्यांचाच धर्मोपदेशक बनायचें.- पण असें करण्यांत एक फार मोठी अडचण होती. एक अति विलक्षण धोका होता. मोलोकाई बेटावर जाऊन राहिलेल्या कोणालाहि परत येण्याची परवानगी नव्हती. त्या भयंकर रोगाचा फैलाव इतर ठिकाणीं होऊं नये म्हणून हा नियम होता. सरकारी कायद्यानेंच तशी व्यवस्था केलेली होती. याचा अर्थ मोलोकाईवर जाणें म्हणजे बाहेरच्या जगाला कायमचें मुकणें. आणि त्याहूनहि भीति वाटण्यासारखा धोका होता

तो–तिथें जाऊन राहणाऱ्या चांगल्या माणसालाहि तो रोग जडण्याचा; तो स्वतःच महारोगाच्या तावडींत सांपडण्याचा.

पण डेमियननें त्या अडचणीची पर्वा केली नाहीं. तो धोका जाणूनबुजून पत्करला. " मी मोलोकाईवर जातों. तिथल्या गरीब बिचाऱ्या महारोग्यांची सेवा करतों. त्यांच्या कमनशिबी शरिराची नि आत्म्याची दुःस्थिती बघून खरोखरी माझें काळीज फाटून जातें आहे." डेमियन असें बोलला आणि त्याप्रमाणें वागलाहि.

मोलोकाई म्हणजे किळसवाण्या मृत्यूची भयंकर खाई. तिचा नुसता विचारहि माणसाच्या जिवाचा थरकांप उडवी. मग त्या खाईंत आपण होऊन उडी घेणाराचें धैर्य केवढें असेल? त्याचें सेवेसाठीं आसुसलेलें अंतःकरण केवढें थोर असेल? फादर डेमियनपाशीं हें सर्व होतें. म्हणूनच तो मोलोकाईंतील महारोग्यांच्या वस्तींत जायला निघाला. तें माहीत असल्यानें तेथील –बिशपनें–वरिष्ठ पाद्ऱ्यानें तेथील महारोग्यांना त्याच्या वतीनें दिलासा दिला. तो त्या महारोग्यांना म्हणाला–" आजवर तुम्ही असे एकाकी व असहाय पडलां आहांत. यापुढें मात्र तुमची तशी स्थिति राहणार नाहीं. हा जो माणूस मीं तुमच्याकडे पाठवीत आहें तो तुमचा पिता होईल. त्याची तुम्हांवर एवढी अपार ममता आहे कीं तुमच्याशीं मिसळून जातांना तो कधींच मागेंपुढें पाहाणार नाहीं. तो तुमच्याबरोबरच जगेल आणि तुमच्यासाठीं तुमच्यासहच मरून जाईल."

बिशपचें हें बोलणें अक्षरन् अक्षर खरें होतें–खरें झालें.

... तें कसें खरें झालें, ती हकीकत माणसाचें काळीज गदगदां हालवून सोडणारी आहे. मी मी म्हणणाऱ्या

सेवावीरांनाहि धक्का देऊन जाणारी आहे. पण ती सांगण्यापूर्वी ती हकीकत घडविणाऱ्या माणसासंबंधीं--फादर डेमियनच्या अगोदरच्या आयुष्यासंबंधीं थोडें सांगितलें पाहिजे.


## जोसेफ जोगी बनला

जोसेफ द वीस्तर हें त्याचें खरें नांव. हा मुलगा १८४० सालीं ३ जानेवारीला ट्रेमेलू खेड्यांत जन्माला आला. ट्रेमेलू हें खेडें युरोप खंडांतील बेल्जियम देशांत आहे. जोसेफचे आई-वडील मोठे धार्मिक वृत्तीचे ख्रिस्ती होते. जोसेफला एक भाऊ व एक बहीण होती. तरीपण जोसेफला लहानपणापासून एकटा एकटाच राहण्याची संवय लागलेली. अगदीं लहानपणींसुद्धां तो चरायला गेलेल्या शेळ्यामेंढ्यामागें एकटाच धांवत सुटायचा. त्याला तो एक छंदच होता. मग असा तो कुठे भरकटेल याचा कांहीं नेम नसायचा.

एकदां आईवडलांबरोबर तो जत्रेला गेला होता. जत्रेंत हिंडतां हिंडतां तो कुठेतरी चुकला. गर्दी खूपच झालेली होती. म्हातारे आईबाप त्याला शोधून शोधून दमले. संध्याकाळ झाली, आतां काय करावें या फिकिरींत ते पडले. अखेर वडिलांना वाटलें कीं, मुलगा चर्चमध्यें असला तर एकदां पाहावें. चर्च म्हणजे ख्रिस्ती देऊळ. जोसेफला लहानपणापासूनच देवळाची नि देवाची ओढ होती. त्यामुळें बापाला वाटलें तें साहजिकच.

मंडळी शोधीत शोधीत चर्चपाशीं आली. दिवस मावळून अंधार पडायला लागला होता. त्या रिकाम्या चर्चमध्यें जाऊन मंडळी मुलाला धुंडाळूं लागली. तों दिसलें कीं लहानगा जोसेफ

प्रवचनकाराच्या व्यासपीठाच्या खालच्या बाजूला एकटाच बसलेला आहे. आणि गुढगे टेकून देवाची प्रार्थना करण्यांत अगदीं गढून गेला आहे !



जोसेफला ख्रिस्ती साधु-सन्तांच्या गोष्टी ऐकायची भारी आवड. त्यासाठीं आई-जवळ तो हट्ट धरून बसायचा. पूर्वीं होऊन गेलेल्या साधु-बुवांप्रमाणें आपणहि बुवा व्हावें असें त्याला वाटायचें.

जोसेफचा थोरला भाऊ जोगी व बहीण जोगीण बनलीं. त्यांनीं संसार सोडला. पण जोसेफ मोठा झाल्यावर त्याच्या वडिलांनीं त्याला मात्र व्यापारी शिक्षणाकडे घातलें.

व्यापारी शाळेंतलें शिक्षण चालू असतांना जोसेफ एका धर्मसभेला गेला होता. तिथलीं भाषणें ऐकून त्याच्या मनावर फार परिणाम झाला. त्याचें मन त्याला सांगूं लागलें कीं भावा-बहिणीप्रमाणें आपणहि धार्मिक कामाकडेच वळलें पाहिजे. ती सभा झाली त्या रात्रीं त्याला झोंपहि आली नाहीं. सारखा तळमळत तो धार्मिक आयुष्याचाच विचार करीत होता. पाद्री बनून लोकांना धर्माची शिकवण देण्याचाच विचार करीत होता. हळूहळू त्याचा तो विचार पक्का झाला.


अखेर एकोणीस वर्षांचा असतांनाच त्यानें व्यापारी शाळा सोडली. घरहि सोडलें आणि थोरल्या भावाप्रमाणेंच तो जोगी बनला. सुंदर चेहेरा, कुरळे केस नि सुदृढ बांधा देवानें त्याला दिला होता. त्याची देहकाठी चांगलीच बळकट होती. आई-बापांच्या मायेची ऊब हवीशी वाटावी इतकें लहान त्याचें वय होतें. तरीपण तो आपल्या भावाला भेटायला म्हणून लोव्हेनच्या ख्रिस्ती आश्रमांत गेला तो तिकडचाच झाला. पुन्हां घरीं परतला नाहीं. आपल्या देहाची सुंदरता नि भावी ऐश्वर्य सारें त्यानें देवा-धर्मासाठीं अर्पण केलें.

## सेवा-भूमीकडे रवाना

जोगी बनल्यावर ख्रिस्ती धर्मोपदेशकाचें मूळचें नांव बदलतें. तसेंच जोसेफनें पूर्वींच्या काळांतील डेमियन या नांवाच्या एका ख्रिस्ती सन्ताचें नांव स्वत:ला घेतलें. तो आतां 'डेमियन' या नांवानेंच ओळखला जाऊं लागला.

ध्यान, चिंतन, प्रार्थना हेंच त्याचें आतां जीवन बनलें. तो कधीं कोणांत मिसळायचा नाहीं कीं गप्पाष्टकांत गुंतायचा नाहीं. संसारी जगापासून तो हळूहळू दूर जाऊं लागला.

तरीपण त्याला तळमळ लागलेली होतीच कीं आपल्याला कांहीं तरी सेवेचें काम करायला मिळावें. परंतु ती गोष्ट त्या आश्रमांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हातीं होती. त्याचें तेथलें शिक्षणहि अजून पुरें झालें नव्हतें. तसें त्याचें वयहि पोरवयांत जमा होण्यासारखें होतें. तरीपण त्याची इच्छा पुरी होण्याचा योग आला. विलक्षण रीतीनें व अचानक जमून आला.



ती १८६३ सालची हकीकत आहे. त्याचा भाऊ पँफिल याला सँडविच ( हवाई ) बेटांवर जायचें होतें. तिकडे निघण्यासाठीं तयारी करायची सूचना त्याला मिळाली. वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं तिथें खिरस्ती धर्मप्रचाराच्या कामासाठीं त्याला पाठविण्याचें ठरविलें

होतें. परंतु सँडविच बेटांवर जायच्या अगदीं ऐनवेळीं प्रॅफिल आजारी पडला. अगदीं अचानक अंथरुणाला खिळला. भावाची ती स्थिति पाहून जोसेफनें त्याला विचारलें " भाऊ तुझ्याऐवजीं मी तिकडे गेलों तर तुला बरें वाटेल का ? " भावानें होकार दिला. जोसेफनें घाईघाईनें वरिष्ठांची परवानगी मिळवली. त्याचें शिक्षण पुरें झालें नसल्यामुळें त्याला ती मोठ्या मिनतवारीनेंच मिळाली.

सँडविचला जाणाऱ्या बोटींत बसतांना त्यानें घरीं आई-बापांना लिहिलें : " . . . आई नि बाबा ! आमच्याबद्दल जरासुद्धां काळजी करूं नका. आम्ही देवाच्या हातीं आहोंत. "

१८६४ च्या मार्च १९ ला डेमियनची बोट होनोलुलु बंदराला लागली. हीच सँडविच किंवा हवाई बेटांची राजधानी. हीं बेटें म्हणजेच डेमियनची सेवाभूमि.

हवाई बेटें सन १७७८ पर्यंत जगाला माहीत नव्हतीं. त्या सालीं कॅप्टन कुक या नांवाच्या खलाश्यानें त्याचा प्रथम शोध लावला. त्यावेळीं त्या बेटांवर रानटी लोकांचीच वस्ती होती. पुढें ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं त्यांना १८२० मध्यें ख्रिस्ती बनविलें. पुढें जगांतल्या इतर ठिकाणांप्रमाणेंच येथेंहि युरोपमधले ख्रिस्ती व्यापारी आले. अगोदर त्यांचा व्यापार आला, नंतर राज्यहि आलें. त्यांनीं आपल्याबरोबर दारू आणली; तसेच भयंकर रोगहि आणले—कीं जे या बेटावरच्या रहिवाश्यांना पूर्वीं माहीतहि नव्हते. सन १८५०–६० च्या सुमाराला रक्त-पिती किंवा महारोग याचा प्रवेश त्या बेटांवर झाल्याचें म्हणतात. आणि त्यानंतर पांच-दहा वर्षांतच या दुष्ट रोगानें त्या बेटाला जवळ जवळ ग्रासून टाकलें. या रोगाचा फैलाव तिथें इतका झाला

कीं अखेर १८६५ सालीं तिथल्या सरकारला कायदा करावा लागला. त्या कायद्याप्रमाणें त्या बेटांच्या समूहावरील महारोग्यांना उत्तरेकडील किनाऱ्यावर असलेल्या मोलोकाई बेटावर नेऊन ठेवण्याचें ठरलें. रोग जडलेल्या माणसांपासून इतरांना संसर्ग होऊं नये, रोगाचा फैलाव होऊं नये, त्याला आळा बसावा. हा तो कायदा करण्यांत सरकारचा उद्देश होता.

परंतु हवाईच्या आदिवासींचा स्वभाव याच्या आड येऊं लागला. ते कमालीचे प्रेमळ नि परोपकारी. आजारी माणसाची चाकरी करायला लागले म्हणजे ते आपल्या जिवाकडेहि पाहायचे नाहींत. त्यामुळें रोग जडलेल्या माणसांना त्यांचे नातेवाईक दडवून ठेवूं लागले. परंतु यामुळें रोगाचा फैलाव थांबेना. हवाई बेटांवर तें एक भयंकर सामाजिक संकटच होतें. पण त्या बिचाऱ्या अडाणी माणसांना तें कसें समजणार? पहिल्या पहिल्यानें सरकारी कायद्याचा अंमल फारसा कडक नव्हता. परंतु पुढें पुढें मात्र त्याची अंमलबजावणी अतिशय कडक रीतीनें होऊं लागली. त्या रोगाचा नुसता संशय आला तरी सरकारी अधिकारी त्या माणसाला पकडून जबरदस्तीनें मोलोकाईवर पाठवीत.

फादर डेमियन १८६४ मध्यें हवाई बेटांवर मिशनरी म्हणून आला. "इथले रहिवासी मला फार आवडतात. मी त्यांच्यासाठीं स्वतःचे प्राणसुद्धां काढून ठेवायला तयार आहें." डेमियननें हवाईवर आल्यानंतर घरीं लिहिलेल्या पत्रांत म्हटलें आहे. आणि खरोखरच डेमियननें तेथील रहिवाश्यांची जिवापलीकडे सेवा करण्यास सुरुवात केली.

ख्रिस्ती धर्मोपदेशक म्हणून त्याच्याकडे त्या बेटांतील

कांहीं भाग नेमून दिलेला होता. त्या भागांत तीन ज्वालामुखी होते. त्यांपैकीं दोन विझलेले असले तरी एक मात्र जिवंत होता. डेमियनच्या वांट्याला आलेला प्रदेश बराच मोठा होता. त्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत पोहोंचण्याला तीन तीन दिवस लागत. लाव्हा तुडवीत पायीं किंवा घोड्यावर, नाहींतर खेचरावर बसून तो सारखा हिंडत असे. त्याची शरीरकाठीहि चांगली दणकट होती. सेवेचा तर त्याचा स्वभावच होता. त्यामुळें त्यानें थोडक्यांच दिवसांत तिथें आपली छाप बसविली. लोकांना तो आपला पाठीराखा वाटूं लागला.

हळूहळू डेमियनला हवाईच्या त्या भयंकर शापाची माहिती झाली. हवाईंतील शेकडों दुर्दैवी माणसें–बाया नि पुरुष तरुण नि म्हातारे–महारोगाच्या तावडींत सांपडलेलीं त्यानें पाहिलीं. त्यांची रवानगी निर्दयपणानें मोलोकाईच्या एकाकी बेटावर होत असतांना तो पाहूं लागला. घरच्या आवडत्या मुलामाणसांपासून ते बिचारे रोगी कठोरपणानें तोडून नेले जात असतांना त्याच्या दृष्टीला पडले. त्याचें काळीज ते देखावे पाहून करपूं लागलें.

हवाई बेटांत अनेक ख्रिस्ती धर्मप्रचारक-मिशनरी-काम करीत. त्यांच्या मुख्याला बिशप म्हणत. या बिशपनें एकदां इतर मिशनऱ्यांपाशीं बोलतांना म्हटलें कीं, मोलोकाईवर खितपणाऱ्या महारोग्यांसाठीं आपण कांहीं करूं शकत नाहीं, याचें आपल्याला फार वाईट वाटतें. त्या बाबतींत मुख्य अडचण होती ती पुरेशा मिशनऱ्यांची. परंतु त्याचवेळीं फ्रान्समधून कांहीं तरुण धर्मप्रचारक हवाईमध्यें कामासाठीं येऊन पोहोंचले होते. ही संधि जवळ असलेल्या डेमियननें साधली. त्या नवीन

आलेल्या कार्यकर्त्यांकडे बोट करून डेमियन बिशपला म्हणाला, " हे नवे मिशनरी आतां आलेच आहेत. माझ्या भागाचें काम यांपैकीं कोणावर तरी सोंपवा. आणि मला मोलोकाईवर जाऊन सेवा करण्याची परवानगी द्या."

यावर बिशपला कांहींच बोलतां येण्यासारखें नव्हतें. डेमियनचें धैर्य, धर्मप्रेम आणि सेवाभाव बिशपच्या चांगलाच परिचयाचा होता. त्यानें त्याला तशी परवानगी दिली. आणि त्याच दिवशीं फादर डेमियन मोलोकाईला जाणाऱ्या बोटीवर चढला. त्या बोटीनें सुमारें पन्नास महारोग्यांची मोलोकाईवर रवानगी होत होती. त्यांच्यासहच डेमियनहि तिकडे निघाला.

## सेवा हेंच जीवन–

डेमियन ज्या कामगिरीवर निघाला होता ती पत्करण्यापूर्वी कोणीहि शंभरदां विचार केला असता. तो माणूस धीराचा असता तरी दहादां दचकला असता. पण डेमियननें आपलें आयुष्य स्वत:साठीं आहे असें कधीं मानलेंच नव्हतें. त्याचा खिस्ती धर्म व देव यांना त्यानें तें केव्हांच देऊन टाकलेलें होतें.

" दुःख दुसऱ्याचें जाणावें । ऐकोन तरी वांटोनि घ्यावें ॥ "

हें तो तरुणपणापासून शिकला होता. आणि तशी संधि आली. कसलाहि गाजावाजा न करतां ही जिवावरची सेवा पत्करून तो कामाच्या मैदानांत लगेच उतरला. त्यासाठीं त्याला कसला विचार करावा लागला नाहीं कीं योजना आंखावी लागली

धा. क्र. ... आ. क्र. ...
वि. ... क्र. ... २१

नाहीं. इतकेंच काय, केवळ अंगावरच्या कपडयांनिशींच तो मोलोकाईवर निघून आला होता.

मोलोकाईवर महारोग्यांच्या सहवासांत राहून त्यांची सेवा करणें म्हणजे काय हें डेमियन पुरतेपणीं समजून होता. या सहवासामुळें केव्हां तरी एक दिवस हा दुष्ट रोग आपल्या-वरहि झडप घातल्याशिवाय राहणार नाहीं याची डेमियनला पुरेपूर जाणीव होती. तरीहि त्यानें जाणूनबुजूनच हें कठिण सेवाव्रत पत्करलें होतें.

मोलोकाईवरील महारोग्यांसाठीं औषधपाण्याची कांहींहि व्यवस्था नव्हती. किंवा खरें सांगायचें म्हणजे तिथे कसलीच कांहीं व्यवस्था नव्हती. झिजत झडत मरण्यासाठीं टाकलेले ते बेवारशी मनुष्यप्राणी होते. एक-दोन नव्हे तर आठवडयाकाठीं आठ ते दहा रोगी तरी अशा स्थितींत मरून जात.

फादर डेमियननें या दुर्दैवी जीवांसाठीं काय काय केलें ? पण यापेक्षां काय केलें नाहीं असें विचारणेंच बरोबर ठरेल. फादर म्हणजे बाप. ‘ फादर ’ डेमियन त्या रोग्यांचा सगळ्या प्रकारें ‘ बाप ’ बनला. फार काय बापसुद्धां पोटच्या पोरांसाठीं कांहीं गोष्टी करायला कचरेल. पण त्या गोष्टीसुद्धां फादर डेमियननें सहज, आनंदानें, प्रेमानें केल्या.

डेमियन मोलोकाईवर आला तेव्हां त्याला राहण्यासारखें घरटेंहि नव्हतें. ख्रिस्ती देवळाच्या आवारांत एका झाडाखालींच त्यानें रात्र काढली. कांहीं दिवस तरी झाडाखालचे दगडगोटे हाच त्याचा बिछाना. आणि झाडाची सावली हेंच पांघरूण. बेटावर राहणाऱ्या रोग्यांची राहण्याची व्यवस्थाहि कांहीं यापेक्षां फार चांगली नव्हती. डेमियननें पहिल्यानें या रोग्यांना राहण्यासाठीं

साठीं घरें बांधण्याची मोहीम हातीं घेतली. अनगड लाकडांनीं उभारलेल्या त्यांच्या झोंपड्या 'कि' नावाच्या झाडाच्या पानांनीं किंवा उसाच्या पालापाचोळ्यांनीं झाकलेल्या असत. फारतर गवतानें शाकारलेल्या असत. म्हणून तिथें येतांच डेमियननें मोलोकाईवरील दुर्दैवी लोकांना राहण्यासाठीं इमारती बांधावयाचें ठरविलें. त्यासाठीं लागणाऱ्या इमारती-सामानाची मागणी होनोलुलुहून करविली. बोटी भरभरून सामान येऊं लागलें. लगेच डेमियननें तिथल्याच कांहीं रोग्यांना हाताशीं धरून बांधकामाला सुरुवात केली. कारण सुतारकाम जाणणारा कोणी सुतार तिथें नव्हता किंवा बाहेरून येण्याची शक्यता नव्हती. स्वत: डेमियननें तर या कामीं खूपच मेहनत घेतली. स्वत:च्या बळकट खांद्यावर तो एकेक प्रचंड तुळई एकटाच वाहून नेई. त्याचें तें राक्षसी बळ पाहून तिथलीं माणसें आश्चर्यानें थक्क होऊन जात.

हळूहळू पक्कीं घरें उभीं झालीं. नंतर डेमियननें त्यांच्यासाठीं गरम कपडे मिळावेत अशी विनंति केली. त्याप्रमाणें तेहि आले. तेथील रोग्यांच्या वसाहतीला पाण्याचा फार तुटवडा होता. पिण्यासाठीं व धुण्यासाठींहि फार दुरून पाणी भरून आणावें लागे. त्यामुळें आधींच रोगानें कमकुवत झालेल्या त्या रोग्यांना फारच कष्ट होत. हे हाल सोसून फार तर पिण्याचें पाणी ते आणीत. पण अंगावरील जखमांच्या घाणीनें भरलेले कपडे व अंग धुवायला मैल मैल जाण्याचा ते आळस करीत. त्यामुळें त्यांच्याजवळ उभें राहणेंहि मुष्किल होई. इतकी दुर्गंधी त्यांच्या अंगाला व कपड्यांना येत असे. डेमियननें यासाठीं एका दूरच्या झऱ्यावरून पाट बांधून आणला. त्यामुळें पिण्यासाठीं व धुण्यासाठीं पाणी भरपूर मिळूं लागलें.

डेमियनला स्वतःला वैद्यकीचें ज्ञान नव्हतें. औषध-पाण्याची माहिती नव्हती. तरीपण त्यानें रोग्यांची शुश्रूषा जमेल तशी सुरू केली. लवकरच त्यानें तिथें एक इस्पितळ उभारलें. इतकेंच नव्हे तर एक कायम डॉक्टर व नर्स तिथें येऊन राहिली तेव्हांच त्याला हायसें वाटलें.

एवढयानेंहि संपलें नव्हतें. आणखी एका विचित्र गोष्टीला डेमियनला इथें तोंड द्यावें लागत होतें. ती म्हणजे या मरणाऱ्या रोग्यांचें दफन. तेंहि काम डेमियननें आपल्याकडेच घेतलें. हीं बेवारशी प्रेतें पुरण्यासाठीं ख्रिस्ती रिवाजाप्रमाणें लागणारी शवपेटीहि तिथें कित्येकांना मिळेना. म्हणून डेमियननें एक "शवपेटी संस्थाच" चालू केली. बाहेरील लोकांनीं त्या संस्थेला भरपूर मदत केली.

डेमियन लिहितो : "मी येथील मरणाऱ्या रोग्यांना पुरण्यासाठीं स्वतःच्या हातांनीं खड्डे खणतों आणि वेळ मिळाला तर त्यांच्या शवपेटयाहि मीच बनवतों. मोलोकाईवर गेल्यापासून १८७९ सालापर्यंत डेमियननें याप्रमाणें स्वतःच्या हातांनीं मूठमाती दिलेल्या रोग्यांची संख्या १६०० वर गेली होती ! यावरून तेथील या दफनाच्या कामाची कल्पना येऊं शकेल.

मोलोकाईवरील असहाय, निराश्रित पडलेल्या रोग्यांसाठीं त्यानें या गोष्टी केल्या. त्या त्यांच्या शरिराचें दुःख कमी करणाऱ्या होत्या. त्यांचीं मनेंहि चांगलीं बनविण्याच्या प्रयत्नांत डेमियन मागें नव्हता. तो तेथें आला तेव्हां देशी दारू प्यावी, पत्ते-जुगार खेळावा, नाहींतर आदिवासी नाचांत दंग होऊन राहावें हाच तिथल्या लोकांचा कार्यक्रम. मरेपर्यंत कसेंतरी जगत राहायचें हेंच त्याचें आयुष्य. परंतु डेमियननें ख्रिस्ती देऊळ उभारून हळहळू त्यांचें चित्त देवाकडे वळवलें.

मोलोकाईवरील या रहिवाश्यांना कायद्याची कधींच पर्वा नसे. वास्तविक 'कि' झाडामासून दारू तयार करण्याला कायद्यानें बंदी होती. पण हे लोक ती बंदी कधींच मानीत नसत. डेमिमननें त्यांना देवाचा व सरकारचाहि कायदा मानण्याचा आग्रह केला. प्रथम मनधरणी केली; कांहीं वेळां कायद्याचाहि आधार त्यासाठीं त्याला घ्यावा लागला असणारच. पण त्यामुळें स्वच्छंद-स्वैर वागायला चटावलेले तिथले रोगी डेमियनचा द्वेष करूं लागले. त्याला शत्रू समजूं लागले. परंतु तरीहि डेमियननें त्यांना सुधारण्याचे आपले प्रयत्न सोडले नाहींत.

## —आणि सेवेंतच्च मरण

इतकें होईपर्यंत सुमारें दहा वर्षांचा काळ गेला. आणि त्या सुमारास सुरुवातीची भीति खरी ठरली. नेहमींप्रमाणें एक दिवस डेमियन महारोग्यांसमोर प्रवचन करायला उभा राहिला. त्या दिवशींच्या प्रवचनाला सुरुवात करतांना तो म्हणाला, "आपण सारे महारोगी—" परंतु पुढचे शब्द नीटसे ऐकूंच आलें नाहींत. कारण आतांपर्यंत "तुम्ही महारोगी" असें तो म्हणायचा. आणि त्या दिवशींचे त्याचे "आपण महारोगी" हें शब्द ऐकून सारेजण कावरेबावरे झाले होते. त्यांनीं एकच गिल्ला केला. परंतु आतां त्याचा कांहीं उपयोग नव्हता. फादर डेमियनला स्वतःलाच महारोगानें पछाडलें होतें !

हें असें होईल याची कल्पना डेमियनला स्वतःला होतीच. त्यामुळें या घटनेनें त्याच्या मनाला कांहीं धक्का बसला नाहीं.



तो त्याला तयार होता. मोलोकाईवर आल्यानंतर घरीं लिहिलेल्या पत्रांत त्यानें म्हटलेंच होतें—"इथें शरिराला नि तसेच आत्म्यालाहि भयंकर धोके आहेत. आई-बाबा ! तुम्ही माझ्यासाठीं दररोज देवाची प्रार्थना करायला चुकूं नका."

आपल्याला जडलेल्या रोगाबद्दल त्यानें फ्रान्समध्यें आपल्या घरीं मात्र कांहीं कळविलें नाहीं. "आतां आपण होनोलुलूला परत येऊं शकत नाहीं" इतकेंच त्यानें हवाईच्या मिशनकेंद्राला लिहिलें होतें. मोलोकाईवरील दुर्दैवी मानवांची सेवा करीत करीतच आतां आपल्या आयुष्याचा अंत व्हावा असें त्यानें आतां मनोमन ठरविलें होतें.

"माझ्या नांवाचा जगांत गाजावाजा होऊं नये" अशी इच्छा डेमियननें एकदां एका पत्रांत लिहिली होती. परंतु मोलोकाई बेटावरील त्या त्याच्या असामान्य धैर्याची हकीकत जगभर लवकरच पसरली. बेल्जियन वृत्तपत्रांनीं तर ती छापूनहि प्रसिद्ध केली. आणि दुर्दैवानें कोणीतरी ती डेमियनच्या

आईच्या कानीं घातली. त्यामुळें ती बिचारी दु:खाचा धक्का बसून लवकरच वारली.

डेमियनच्या असामान्य उदाहरणानें जग क्षणभर हादरलें. पण त्याला त्या भयंकर स्थितींतून कोणीच सोडवूं शकत नव्हता. डेमियनहि तशी अपेक्षा करीत नव्हता. जगाजवळ त्यानें एवढेंच मागितलें: 'या दीन दु:खित रोगग्रस्तांना मोकळ्या हातांनीं मदत करा.' जगानें त्याची ही हांक ऐकली. आणि डेमियनच्या मनांत फार दिवस असलेली आकांक्षा फळाला आली. मोलोकाईवरील रोग्यांना औषधपाणी, अन्नवस्त्र, आसरा-आधार यांची सोय झाली. तेथील रोग्यांच्या नांवानें जगांतून ठिकठिकाणाहून अनेक वस्तू 'भेट' म्हणून येऊं लागल्या. निराश्रित मानवांना जगाच्या पाठीवर आपली आठवण ठेवणारे कोणी सज्जन आहेत एवढा दिलासा मिळाला.

सतत सतरा वर्षें डेमियन सेवा करीत मोलोकाईवर राहिला. पुढचीं सात वर्षें तर त्या भयंकर रोगाशीं झगडतां झगडतांनाच त्याला हें सेवाव्रत चालवावें लागलें. आपण येथील रोग्यांना वांचवायला आलों पण या रोगापासून आपण स्वत:ला वांचवूं शकलों नाहीं, अशी खंतहि त्याला कधीं वाटली नाहीं. उलट तो म्हणाला, "कृपाळू देव मला पावन करून घेण्यासाठीं काय करायला हवें हें उत्तम जाणतो. त्याच्या हातीं माझें आयुष्य मी अगदीं मनापासून सोपविलेलें आहे."

मोलोकाईवरील महारोग्यांचा तो आतां खराखुरा 'सोबती' झाला होता. त्या रोग्यांच्या सुखसोयींची सर्व प्रकारची काळजी घेणें हेंच त्याचें काम होतें. त्यांना ख्रिस्ती धर्माचा उपदेश करणें हा तर त्याचा पेशाच. त्याशिवाय त्यांना

तो औषधोपचार करी. इतकेंच नव्हे तर रोगानें हात झडून गेलेल्या रोग्यांना आपल्या हातानें भरविण्यांतहि तो सेवेचा आनंद मानी!

प्रेम व त्याग यांचा हा पुतळा अखेर १८८९ मध्यें मरण पावला. ज्यांची सेवा त्यानें जिवाभावानें, मायाममतेनें केली त्यांच्या घोळक्यांतच त्याला मृत्यु आला. तो ज्यांच्या दुःखासाठीं रडला होता ते त्याच्या मृत्यूनें ढसाढसा रडले. तो मोलोकाईवर पहिल्यानें आला तेव्हां चर्चच्या आवारांतील एका झाडाखालीं त्यानें डोई टेकली होती. त्याच झाडाखालीं अखेर त्यानें कायमची डोई ठेवली. त्याच्या अखेरच्या इच्छेप्रमाणें त्याचें त्या झाडाखालींच दफन केलें; तिथेंच त्याची कबर बांधली.

मरणाच्या हद्दीवर घुटमळत असतांना तो म्हणाला होता : " मी जेव्हां देवापाशीं जाईन तेव्हां माझी देवाजवळ जर कांहीं पत असेल तर त्याच्यापाशीं इथल्या महारोग्यांसाठीं रदबदली केल्याशिवाय मी कधींच राहणार नाहीं. "

+++

" देवाच्या राज्यांत हद्दपारी ही गोष्टच नाहीं.
देवाला अर्पण केलेल्या आत्म्याला रोगाचें नांवहि नाहीं. "

–डेमियन

22 ... 
... 
683
3/7/5

ज्याला वाचतां येतें, त्याला शिकतां येतें.
ज्याला शिकतां येतें, त्याला सुधारतां येतें.
म्हणून, वाचा—शिका नि सुधारा.

तें वाचावें—कीं जें मनाला वाईट वागण्यापासून वांचवील
असें शिकावें—कीं जें माणसाला भला माणूस बनवील.
इतकें सुधारावें—कीं जें इतरांना उदाहरण म्हणून होईल.

++++++

आमची ही लोक-शिक्षण माला
या उद्देशानेंच सुरू झाली आहे.

++++++

'लोक-शिक्षण मालेचीं'
हीं अभिनव बोधक पुस्तकें

- तीन कथा—६२ नये पैसे
- श्रीरामदासस्वामी म्हणतात—५० नये पैसे

या मालेंतील
पुढील पुस्तकें
ल व क र च
प्रसिद्ध होतील.



IRBK-0106242

बोरा ॲन्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड
३, राऊंड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २